महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ ०९ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १६४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नागपूर :** शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त दोन्ही सभागृहात आज वंदे मातरमचं सामूहिक गायन झालं. त्यानंतर तालिका अध्यक्षांची नियुक्ती झाली. काँग्रेस नेते नाना पटोले आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव यांनी हे अधिवेशन वाढवून देण्याची मागणी अध्यक्षांकडे केली. विधिमंडळाचं कामकाज गुंडाळण्याचा प्रयत्न करण्यात येत असून कामकाज घाईघाईनं उरकलं जात आहे, असा आरोप पटोले यांनी केला. यावर विधिमंडळाचं अधिवेशन आणि कामकाज यावर कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सर्वसंमतीनं निर्णय होतो, त्यामुळे आता त्यावर वेगळी चर्चा होणार नाही, असं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. तर आचारसंहितेमुळे हे अधिवेशन अल्पकालीन असल्याचं स्पष्ट करून हा कालावधी पुढील अधिवेशनात भरून काढू अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या अधिवेशनातही सरकारनं पुरवणी मागण्या मांडल्या. ७५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या या पुरवणी मागण्यांपैकी १५ हजार ६४८ कोटी रुपये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी राखीव आहेत. लाडकी बहीण योजनेसाठी ६ हजार कोटींहून अधिक तर मनरेगासाठी साडे ३ हजार कोटी रुपयांची तरतूद यात आहे. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी ३ हजार कोटी रुपये तर एसटी महामंडळासाठी २ हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. आयुष्मान भारतासाठी सव्वा ३ हजार कोटी, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी २ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद सरकारनं यात केली आहे. त्यानंतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.



## विरोधी पक्षनेते पदावरून ठाकरे गटात विसंवाद

**हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधी पक्षनेतेपदावरून ठाकरे गटातील विसंवाद चव्हाट्यावर आला आहे. या पदासाठी भास्कर जाधव यांचं नाव अनेक महिन्यांपासून आघाडीवर असतानाच अचानक आदित्य ठाकरेंना पुढे करण्याच्या चर्चेला वेग आल्याने नवा पेच निर्माण झाला आहे. उद्धव ठाकरे स्वतः आदित्य ठाकरेंना ही जबाबदारी द्यावी, यासाठी प्रयत्नशील असल्याची माहिती आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी समन्वय साधण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

## महत्वाचे



## कल्याण डोंबिवली पोलिसांच्या ताफ्यात अत्याधुनिक न्यायवैद्यक वाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण -** गुन्हा घडल्यानंतर घटनास्थळावरून तात्काळ वस्तुस्थिती दर्शक भौतिक, जैविक, रासायनिक पुरावे गोळा करून त्या आधारे पोलिसांना तात्काळ गुन्ह्याचा शोध घेण्यासाठी साहाय्य व्हावे, या विचारातून शासनाने ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या माध्यमातून कल्याण डोंबिवली पोलिसांच्या ताफ्यात अत्याधुनिक यंत्रणांनी सज्ज एक न्यायवैद्यक वाहन उपलब्ध करून दिले आहे.

खून, हाणामारी, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारी कोणतीही परिस्थिती निर्माण झाल्यानंतर त्या ठिकाणी कल्याण पोलीस परिमंडळातील न्यायवैद्यक वाहन तातडीने गुन्हा घडल्याच्या ठिकाणी जाईल. या वाहनात न्यायवैद्यक विषयक तज्ज्ञ असलेल्या आठ जणांचे एक पथक आहे. हे पथक घटनास्थळावरून गुन्ह्याला पुरक असे सबळ भौतिक, जैविक, रासायनिक, दृश्य सदृश्य पुरावे जमा करील. त्याचे तात्काळ विश्लेषण करून त्याचा अहवाल स्थानिक पोलिसांना उपलब्ध करून देईल. त्यामुळे पोलिसांचा तपासाचा मार्ग मोकळा होणार आहे, असे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले.



## पालिका निवडणुकांसाठी जीवापाड झटेन - गणेश नाईक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** लोकसभा, विधानसभा निवडणुकीत जितका झटलो नाही, तितका महापालिका निवडणुकांना झटेन असे वक्तव्य वनमंत्री गणेश नाईक यांनी नवी मुंबईत बोलताना केले. नवी मुंबईत प्रभाग बदलामुळे माजी नगरसेवकांवर निर्माण झालेल्या निराशेवर धीर देत त्यांचे मनोबल वाढवण्याचा प्रयत्न नाईक यांनी यावेळी केला. नवी मुंबईतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. नाईक आणि शिंदे यांच्या संघर्ष देखील पाहायला मिळाला. नवी मुंबई महापालिकेवर भाजपचा महापौर बसणार असे वक्तव्य गणेश नाईक यांनी केले आहे. त्यामुळे नवीमुंबई महापालिका निवडणुकीत चुरशीची लढत पाहायला मिळण्याची चिन्हे आहेत. नवी मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकांसाठी गणेश नाईक सक्रीय झाले असून त्यांनी महापालिका निवडणुकीची रणनीती आखण्यावर भर दिला आहे. गणेश नाईक यांच्या या पुढाकारामुळे पक्षातील एकजूट वाढली आहे आणि कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचल्याचे दिसत आहे.

## आज डोंबिवलीत पाणी नाही !

**देखभाल, दुरुस्तीसाठी "शटडाऊन" १५ तासांची पाणीकपात**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. ८:** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने महत्त्वाच्या देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांसाठी मंगळवारी (ता. ९) डोंबिवलीच्या पूर्व आणि पश्चिम भागातील पाणीपुरवठा १५ तासांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सकाळी ९ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत पाणीपुरवठा बंद राहील. मोहिली उदंचन केंद्रातून नेतिवली जलशुद्धीकरण केंद्रात पाणी शुद्ध केले जाते. येथील पाणी पुरवठा व्यवस्थेतील महत्त्वाचे काम, फिल्टरबेड आऊटलेट जलवाहिनी बदलण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. अमृत-२ योजनेअंतर्गत खंबाळपाडा परिसरात उभारण्यात आलेल्या नवीन उंच जलकुंभाला मुख्य इनलेट जलवाहिनीशी जोडण्याचे महत्त्वाचे काम घेण्यात आले आहे. तसेच डोंबिवली विभागातील वितरण व्यवस्थेतील आवश्यक देखभाल आणि दुरुस्तीची कामे घेण्यात आली आहेत. या सर्व कामांसाठी नेतिवली जलशुद्धीकरण केंद्राचा १५ तासांचा "शटडाऊन" घेण्यात येणार आहे. या कालावधीत नागरिकांनी पाण्याचा आवश्यक साठा करून गैरसोय टाळण्यासाठी महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन पाणी पुरवठा विभागाने केले आहे.

# गुरवली रेल्वे स्टेशन होऊ शकत नाही !

## मध्य रेल्वेचे लेखी स्पष्टीकरण

**स्थानिक ग्रामस्थांच्या पाठपुराव्यावर रेल्वेनं फिरवलं पाणी**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर : मध्य रेल्वेच्या टिटवाळा- खडवली स्थानक दरम्यान गुरवली स्थानकाची मागणी ठाणे रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष नंदकुमार देशमुख यांनी केली होती. मात्र हे स्थानक झाल्यास रेल्वेच्या वेळापत्रकावर परिणाम होईल आणि त्याचा त्रास प्रवाशांना होईल, असे कारण सांगून रेल्वे प्रशासनाने ते स्थानक होऊ शकत नाही, असे पत्राद्वारे कळवले आहे.**

मध्य रेल्वेचे उपमुख्य वाणिज्य व्यवस्थापक दीपक शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार गुरवली स्थानक झाले आणि त्या ठिकाणी लोकल थांबा दिल्यास रेल्वे गाड्यांचा परिचालन वेळ वाढेल, त्यामुळे उपलब्ध रेल्वेगाड्या रद्द होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आहेत त्या लोकलच्या वेळापत्रकावर परिणाम होईल, असे पत्रात नमूद केले आहे.

या पत्रामुळे १९६५ पासून ग्रामस्थांनी स्थानक व्हावे यासाठी जो पाठपुरावा आतापर्यंत केला, त्यावर पाणी फिरवले गेल्याची भावना देशमुख यांनी व्यक्त केली. तसेच रेल्वेच्या नकारात होकार दडलेला असतो, असेही सांगत पुन्हा नव्याने पाठपुरावा करणार असल्याचे देशमुख म्हणाले.

**■ रेल्वेकडून तांत्रिक कारणे**

देशमुख यांनी २८ सप्टेंबर, ६ ऑक्टोबर रोजी तेथे स्थानक व्हावे या संदर्भात मध्य रेल्वेला पत्र दिले होते. त्या पत्रांचा आधार घेत रेल्वे अधिकाऱ्यांनी त्यांच्या याच विषयीच्या पत्राला २६ ऑगस्ट २०२२, ४ जून २०२४ आणि १४ नोव्हेंबर २०२४ ला रेल्वेने हीच तांत्रिक कारणे देऊन तेथे स्थानक होऊ शकत नाही, हे वेळोवेळी स्पष्ट केले होते, असेही पत्रात म्हटले आहे.

**या पत्रामुळे ग्रामस्थांचा पाठपुराव्यावर पाणी फिरलवले गेल्याची भावना रेल्वे प्रवासी संघटनांनी व्यक्त केली आहे. तसेच याप्रकरणी पुन्हा सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. गुरवली स्थानक झाल्यास प्रवाशांसाठी हे सोयीचेच ठरेल, असे रेल्वे प्रवासी संघटनांनी म्हटले आहे.**



> **कल्याण डोंबिवलीमध्ये भाजप आणि शिवसेनेचा वाद असला तरी, निवडणूक जवळ आल्यानंतर हा वाद कमी होईल. जरी वाद कमी झाला नाही आणि युती झाली नाही तरी सुद्धा निवडणुकीनंतर आम्ही सगळे एकत्र येणार आणि या महापालिकेचा महापौर महायुतीचा होणार याबद्दल आम्हाला शंका अजिबात नाही**
> **● रामदास आठवले**


# शिंदे आणि पवारांच्या आधीपासून आम्ही भाजपासोबत ! - रामदास आठवले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : एकनाथ शिंदे आणि अजित पवार भाजपासोबत येण्याच्या आधीपासून रिपब्लिकन पक्ष त्यांच्या सोबत होता आणि आजही आहे. आता हे मोठे मित्र भाजपासोबत आल्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या नावाची चर्चा कमी होत असली, तरी रिपब्लिकन पक्ष प्रामाणिकपणे भाजपासोबत उभा आहे," असे वक्तव्य रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी कल्याणमध्ये बोलताना केले.**

### कल्याण डोंबिवलीचा महापौर महायुतीचा

कल्याण-डोंबिवली पालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर कल्याण शहरात रिपब्लिकन पक्षाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी रामदास आठवले यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते पुढे म्हणाले, कल्याण डोंबिवली महापालिका मुंबईच्या जवळच असणारी महापालिका आहे. या ठिकाणी महायुती म्हणून निवडणूक लढवावी अशी आमची भूमिका आहे. जागा वाटपामध्ये या सगळ्या तीन पक्षामध्ये किती एकमत होतय अजून सांगता येत नाही आहे. परंतु, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा तसा भाजपचा पूर्वीचा मित्र आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टीने आपल्या कोट्यातून आम्हाला जागा द्याव्यात अशा पद्धतीची आमची मागणी आहे, असे मत आठवले यांनी यावेळी व्यक्त केले. कल्याण डोंबिवलीचा महापौर महायुतीचा असावा या दृष्टिकोनातून आपल्याला प्रयत्न करण अत्यंत आवश्यक आहे, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.



## शेतकरी - कामगार नेते बाबा आढाव यांचं निधन

**पुणे :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी आणि कामगार नेते बाबा आढाव यांचे आज रात्री 8 वाजून 25 मिनिटांनी निधन झाले, ते ९५ वर्षांचे होते. 'गेल्या बारा दिवसापासून पुना हॉस्पिटलमध्ये बाबा आढाव यांना ऍडमिट केलेले होते. सुरुवातीला ते उपचारांना प्रतिसाद देत होते. त्यानंतर त्यांची किडनी फेल झाली आज आठ वाजून पंचवीस मिनिटांनी त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यात त्यांचे निधन झालं. भवन येथे त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. सायंकाळी पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# नागरिकांच्या हरकतीपुर्वीच ठाण्यात शेकडो वृक्षांची कत्तल ? - शरद पवार गटाचा आरोप



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या जागेत विस्तारीत रेल्वे स्टेशन आणि मनोरुग्णालयाची विस्तारीत इमारत उभारणीसाठी १६१४ वृक्षांपैकी ७२४ वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने ठाणे महापालिकेकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. मात्र, या वृक्ष तोडीबाबत नागरिकांच्या हरकती येण्यापुर्वीच येथील शेकडो वृक्षांची कत्तल करण्यात आल्याची धक्कादायक बाब राष्ट्रवादी शरद पवार गटाने पुढे आणली आहे. या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाने केली आहे.

ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या मनोरुग्णालयाच्या जागेत विस्तारीत रेल्वे स्टेशन आणि मनोरुग्णालयाची विस्तारीत इमारत उभारणीचे काम करण्यात येणार आहे. या कामासाठी मनोरुग्णालय परिसरातील एक हजार ६१४ वृक्षांपैकी ७२४ वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने ठाणे महापालिकेकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. या प्रस्तावात ३०३ वृक्ष तोडले जाणार आहेत तर, उर्वरित ४२१ वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात येणार आहे. असे असले तरी पुनर्रोपणाचे ठिकाण, देखभाल आणि जगण्याचे प्रमाण याबाबत मात्र कोणतीही स्पष्टता नाही. या वृक्षांमध्ये फणस, कैलासपती, अशोक, आंबा, बदाम, शेवगे, नारळ, ताड, साग, भोकर, कांचन, अनंता, बेहरी माड, कडुलिंब, चाफा, उंबर यासारख्या विविध वृक्षांचा सामावेश आहे. या भागातील हरित पट्टा नष्ट होणार असल्यामुळे त्यावरून टिका होत आहे.







# अंबरनाथ : धुळीमुळे प्रदूषणाचा धोका वाढला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ, ता. ८ :** अंबरनाथ शहरातील हवा गुणवत्ता 'अस्वस्थ' श्रेणीत पोहोचली असून, प्रदूषणाची पातळी आता मुंबई आणि ठाण्यासारख्या महानगरांच्या जवळपास आहे. धूळ आणि वायू प्रदूषणामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, अशी चिंता व्यक्त होत आहे.

प्रदूषण वाढण्यास मुख्यत्वे एमआयडीसी परिसरातील रासायनिक कारखाने कारणीभूत आहेत. वारंवार होणारे अपघात, विषारी वायुगळती आणि रस्त्यांवरील बांधकाम व वाढत्या वाहतुकीमुळे शहरात धूळ आणि धुराचे प्रमाण कमालीचे वाढले आहे.

हवेतील वाढत्या धूलिकणांमुळे रहिवाशांना श्वसनाचे विकार, खोकला, दम लागणे आणि डोळे चुरचुरणे यांसारख्या समस्या सतत भेडसावत आहेत. कल्याण-कर्जत महामार्गावरील वाढती रहदारी, रस्त्यांवरील खड्डे, वाहनांचा धूर आणि रस्त्यावर साचलेले बांधकाम साहित्य व कचऱ्याचे ढिगारे यामुळे हवेतील धूळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. गेल्या काही वर्षांत औद्योगिक वसाहतीत अनेक गंभीर दुर्घटना घडल्या आहेत, ज्यामुळे कामगारांची सुरक्षा आणि पर्यावरणीय प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

सप्टेंबर आणि नोव्हेंबर २०२४ मध्ये वायुगळती व स्फोटाच्या घटनांमुळे कामगार जखमी झाले होते. यापूर्वी २७ मार्च २०२१ रोजी विषारी वायूमुळे गुदमरून तीन कामगारांचा मृत्यू झाला होता.



# बेकायदेशीर बाईक टॅक्सी सेवांवर आरटीओकडून दंडात्मक कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) मोटार वाहन कायद्याचे गंभीर उल्लंघन करणाऱ्या बेकायदेशीर बाईक टॅक्सी सेवांवर कठोर कारवाईचा बडगा उगरला आहे. आरटीओ अधिकाऱ्यांनी कल्याणच्या हद्दीत विना परवाना व्यावसायिक प्रवासी वाहतूक करणाऱ्या 'रॅपिडो' कंपनीच्या 47 दुचाकी चालकांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे. कल्याण आरटीओने दिलेल्या माहितीनुसार, मोटार वाहन कायदा १९८८ च्या विविध कलमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी बाईक टॅक्सी सेवा पुरवणाऱ्या अनेक दुचाकीस्वारांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे. कल्याण आणि आसपासच्या परिसरात आवश्यक व्यावसायिक परवान्याशिवाय बाईक टॅक्सींच्या संख्येत मोठी वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी सांगितले की, व्यावसायिक प्रवासी वाहतुकीची परवानगी नसलेल्या या बाईकस्वारांकडून एक लाख रुपयांहून अधिक दंड वसूल करण्यात आला आहे. नागरिकांकडून सातत्याने येत असलेल्या तक्रारींमुळे या कारवाईला वेग आला.

आरटीओने केवळ वैयक्तिक चालकांवरच नव्हे, तर या बेकायदेशीर कामात गुंतलेल्या ऑनलाइन प्लॅटफॉर्म चालवणाऱ्या खासगी कंपनीवरही कठोर कायदेशीर पाऊल उचलले आहे. मोटार वाहन निरीक्षक सुप्रिया गावडे यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात 'दि रुपन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड' (रॅपिडो) आणि तिच्या संचालकांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

गुन्ह्याच्या नोंदीनुसार, कंपनी जानेवारी २०२५ पासून व्यावसायिक परवान्याशिवाय ऑनलाइन नोंदणीद्वारे प्रवाशांना सेवा पुरवत होती. हे कृत्य बेकायदेशीर प्रवासी वाहतुकीच्या कक्षेत येते आणि यामुळे सरकारी महसूलाचेही नुकसान झाले. आशुतोष बारकुल यांनी स्पष्ट केले की, मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ६६ नुसार, रॅपिडो सह ओला आणि उबर सारख्या सर्व खासगी कंपन्यांना दुचाकी वाहने प्रवासी वाहतुकीसाठी वापरण्यापूर्वी व्यावसायिक परवाना घेणे बंधनकारक आहे. त्यांनी सांगितले की, परवानगीशिवाय पेट्रोलवर चालणाऱ्या बाईक्स प्रवासी सेवेसाठी वापरणे हा कायद्याचा स्पष्ट भंग आहे आणि विहित नियमांची पूर्तता केल्यानंतरच अशा कंपन्यांना कायमस्वरूपी परवाने दिले जातील. अधिकारी बारकुल यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी बेकायदेशीर बाईक सेवांचा वापर करणे टाळावे, कारण परवाना आणि परमिट नसलेले हे चालक केवळ कायद्याचे उल्लंघन करत नाहीत, तर ते प्रवाशांच्या जीवितासाठी आणि मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठीही धोकादायक ठरू शकतात.

# अर्थपूर्ण वाचनाने जीवनाला अर्थ प्राप्त होतो आणि व्यक्तिमत्वाचा विकास होतो - डॉ आनंदराव सूर्यवंशी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : बालक मंदिर संस्था कल्याण पश्चिम येथे दिनांक ५ डिसेंबर ते सहा डिसेंबर 2025 रोजी अक्षरमंच सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान यांच्या वतीने अखंड वाचन यज्ञ पार पडला .सदर कार्यक्रमात दिनांक ६ डिसेंबर 2025 रोजी ' गंध फुलांचा 'या कविता संग्रहातील काही कवितांचे अभिवाचन झाले. सदर कार्यक्रमासाठी डॉक्टर तरुलता धानके मॅडम, डॉ. आनंदराव सूर्यवंशी लेखक व माजी उप शिक्षण अधिकारी प्रा.विष्णू दिसले सर ,संपादक मच्छिंद्र कांबळे डॉ.प्रकाश माळी आणि इतर मान्यवर यांची उपस्थिती होती. वाचकांनी कविता




सादर करून कार्यक्रमाला बहर आणला सदर कार्यक्रमात श्रीमती धानके यांनी कविता संग्रह त्यांना कसा भावला यासंदर्भात आपले मौलिक विचार मांडले. डॉ. आनंदराव सूर्यवंशी यांनी "अर्थपूर्ण वाचनाने जीवनाला अर्थ प्राप्त होतो आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो" असे उद्गार काढले .प्रसिद्ध विचारवंत बेकन यांनी म्हटल्याप्रमाणे ग्रंथ माणसाला पूर्णतिकडे नेतात वाचन समृद्ध असेल तर व्यक्तिमत्वाचा परिपूर्ण विकास होतो असे विचार मांडले. तत्वज्ञ सेरे यांचे मत मांडताना त्यांनी सांगितले की, पुस्तक नसलेलं घर म्हणजे आत्मा नसलेला शरीर होय .आपण साधारणपणे 70 ते 80 वर्ष जगतो .सर्वच अनुभव आपण उपभोगु होऊ शकत नाही. विविध क्षेत्रातील अनुभव,घटना ज्या लेखकांनी लिहिल्या आहेत त्यांच्या पुस्तकातून वाचकास अनुभवता येतात,किंवा अनुभूती घेता येते.म्हणून विजयकुमार देसले सारख्या कवींनी, लेखकांनी लिहिले ल्या पुस्तकांचे वाचन अर्थात विविध क्षेत्रातील पुस्तकांचे वाचन हा महत्त्वपूर्ण भाग होय. लोकमान्य टिळकांनी ' ग्रंथ हेच गुरु' हा संदेश दिला.त्यांनी गीतारहस्य सारखे ग्रंथ लिहिले .त्यात कर्मयोग ,भक्तीयोग आणि ज्ञानयोग बाबत जनजागृती केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्याधुनिक घटना लिहिताना अनेक देशांच्या घटनांचा अभ्यास करून ते घटनेचे शिल्पकार,भारतीय न्याय शास्त्रज्ञ ,अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ, समाज सुधारक, जागतिक दर्जाचे विद्वान कसे झाले, ते विशद केले. सदर वाचन सत्रात ठाणे जिल्ह्यातील उत्तम कवी, लेखक ,व्याख्याते आणि महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक विजयकुमार देसले यांच्या अध्यक्षते खाली ' गंध फुलांचा ' कविता संग्रहातील कवितांचे अभिवाचन पार पडले.वाचकांना प्रमाणपत्रे देण्यात आली.अर्जुन बाम्बेरे आणि प्रगती हरड यांनी आपल्या खुमासदार शैलीत सूत्रसंचालन करून रंगत भरली. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# रसिकांच्या उदंड प्रतिसादात संगीतभूषण पं. राम मराठे महोत्सवाची सांगता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** नर्तनातील भावतरंग, नृत्याचे लयबद्ध घुंगरू, गायनाचे स्वरमधुर सूर, हार्मोनियमच्या सुरेल कळा, तालवाद्याचा अद्वितीय झंकार.. आणि जय जय गौरीशंकर या संगीत नाटकाने भारावलेले रसिक..वन्समोअरची दाद... अशा सांगितीक वातावरणात ठाणे महापालिका आयोजित पं. राम मराठे महोत्सवाचा अखेरचा दिवस प्रेक्षकांना एक अनोखी भेट देणारा ठरला.

ठाणे महापालिकेच्या माध्यमातून 5 ते 7 डिसेंबर 2025 या कालावधीत राम गणेश गडकरी रंगायतन येथे 30 वा संगीतभूषण पं. राम मराठे महोत्सव आयोजित केला होता. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर, पं. मुकुंद मराठे, पं.विवेक सोनार, ज्येष्ठ नृत्यांगना डॉ. मंजिरी देव, तबलावादक रवी नवले तसेच ठाणेकर रसिक उपस्थित होते.

समारोपाच्या दिवशीचे सकाळचे पहिले सत्र कथ्थक नृत्यांना वैशाली वैशंपायन पोतदार यांची एकल कथक नृत्याने गुंफले. गणेश वंदना, ताल प्रस्तुती आणि ठुमरी असा पारंपरिक कथक नृत्य क्रम त्यांनी सादर केला.




पंडिता गुरु रोहिणी भाटे रचित गणेश वंदनेने त्यांनी सुरुवात केली. त्यानंतर तीन तालप्रस्तुती मध्ये उठान, थाट, आमद, लयीत सादर करत प्रेक्षकांना आनंद देत वाढत्या लयीसोबत तडफदार बंदिशींची मालिका सादर केली. या वाढत्या लयीला स्वल्पविराम देत संत सोयरा बाईंचे एक अत्यंत संवेदनशील आणि सर्जनशील विषयावरील ' 'देहासी विटाळ म्हणती सकळ आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध' हे स्त्रियांच्या वेदनेवर विठ्ठलाला प्रश्न करणारं काव्य त्यांनी सूचक आणि समर्पक अभिनयातून मांडत प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांना तबला साथ प्रसाद पाध्ये यांनी, हार्मोनियमची साथ राजस खासगीवाले, अर्चना गोरे यांनी गायन साथ आणि त्यांच्या शिष्या जुई पाठक यांनी उत्तम अशी पढंत करून कार्यक्रमाची रंगत वाढविली.

सकाळच्या सत्रातील दुसरे पुष्प गायिका सावनी परेकर यांनी गुंफले. गानहिरा पुरस्कार प्राप्त आणि युवा गायिका असा नावलौकिक असलेल्या सावनी परेकर यांनी शास्त्रीय गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी राग विभास मारवा थाटातील तीन रचना सादर केल्या. बडाख्याल, संगीतकार पं. अनंत जोशी यांची 'अलबेलो मेरे राजकुमार'ही बंदिश सादर कली. या बंदिशीनंतर पारंपारिक बंदीश आणि द्रुत एक तालातील तराना सादर केला. तर मिश्र खमाज आणि दादरा रागाने त्यांनी दुसऱ्या पुष्पाची सांगता केली. त्यांना तबल्यावर आदित्य पानवलकर यांनी तर हार्मोनियमवर अमेय गांधी यांनी साथ संगत केली.

प्रसिध्द संगीतकार हार्मोनियमवादक अनंत जोशी यांनी पं. राम मराठे महोत्सवातील सकाळच्या सत्रातील तिसरे पुष्प गुंफले. हार्मोनियमवरच्या स्पर्शाने त्यांनी प्रत्येक ताल, राग, आणि भावना रसिकांपर्यंत पोहचवत त्यांची दाद मिळवली. त्यांना तबल्यावर अभय दातार यांच्यासह समीर गानू अभ्यंकर यांनी साथसंगत केली.

सायंकाळच्या सत्रातील पाचवे पुष्प पद्मश्री पं. सुरेश तळवलकर यांनी गुंफले. तीन तालानी त्यांनी कार्यक्रमाची सुरूवात केली. तबला, पाश्चात्य ड्रम, कथक नृत्य, हिंदुस्तानी गायन, संगीत, सतार आणि बासरी यांना एकत्रित करणारा हा अभिनव दृष्याविष्कार रसिकांना अनुभवायला मिळाला. वादन, गायन आणि नर्तन या तिघांच्या समन्वयातून संगीत रसिकांसमोर पोहचते आणि हेच ताल यात्राचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी त्यांनी पं. रामभाऊ मराठे यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांना तबल्यावर सावनी तळवलकर, हार्मोनियमवर अभिषेक शिनकर, गायनासाठी नागेश आडगावकर, पखवाजवर रोहित खवळे, कहोजवर ईशान परांजपे यांनी तर कलाबाशवर ऋतुराज हिंगे यांनी साथसंगत केली होती. सहावे पुष्प तानसेन पुरस्कार प्राप्त पं. राजा काळे यांनी गुंफले, त्यांनी आपल्या गायनाने रसिकांना मंत्रमुग्ध करीत महोत्सवाची सांगता झाली. त्यांना हार्मोनियमवर सिध्देश बिचोलकर, पं शरद मटकर, पं. तुळशीदास बोरकर यांनी तर तबल्यावर मंदार पुराणिक यांनी साथसंगत केली.

संगीत जय जय गौरीशंकर नाटकाला रसिकांची गर्दी तिसऱ्या दिवशीच्या दुपारच्या सत्रात सादर झालेल्या परस्पर सहायक मंडळ (वाघांबे) मुंबई निर्मित जय जय गौरीशंकर या संगीत नाटकाला ठाणेकर रसिकांनी रंगायतन तुडुंब भरले होते. सप्तसूर झंकारीत बोले नांदी .. प्रिय करा, सावज माझे गवसलं, ती सुंदरा, सुरगंगा मंगला, भरे मनात सुंदरा, नारायणा रमारमणा, कशी नाचे छमाछम, जय जय रमारमण श्रीरंग अशी एकाहून एक सरस गाणी युवा कलाकारांनी अप्रतिम सादर केली. कैलास पर्वतचा देखावा, नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूषा, वेशभूषा, आणि सर्वांची उत्तम देहबोली आणि स्पष्ट उच्चारांसह संवाद त्यामुळे नाटक रसिकांच्या पसंतीस उतरले. या नाटकात शंभरपूर्वक प्रयोगात विजयाची भूमिका केलेली प्राजक्ता मराठे तिने हिने या नाटकातील तिने गाजवलेले नाट्यपद 'प्रियकरा नसे हा छंद बरा..' हे पद वन्समोर सह सादर करून पंडित राम मराठे ह्यांच्या गायकीची परंपरा दाखवली. या मूळ नाटकाला ठाण्यातील ज्येष्ठ नाट्यतपस्वी नटवर्य मामा पेंडसे यांनी केले होते. तर ललितकलादर्श नाट्यसंस्थेतर्फे भालचंद्र पेंढारकर यांनी निर्मिती करून पंडित राम मराठे भगवान शंकर, प्रसाद सावकार इत्यादी कलाकारांनी या नाटकाचे तब्बल 2250 प्रयोग भारतभर केले असल्याचे पं. मुकुंद मराठे यांनी नमूद केले.

संपूर्ण महोत्सवाचे सूत्रसंचलन राजेंद्र पाटणकर यांनी केले. तसेच हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागातील मनाली माईणकर, संदीप जिनवाल, विकास मोरे, सुजाता सोनावणे, मंदार गायकवाड यांच्यासह सर्व कर्मचा-यांनी विशेष मेहनत घेतली.

# खारबाव येथील बी.एन.एन.कॉलेजचे ग्रामीण विकास व्यावहारिक शिबीर संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहर व तालुक्यातील बी.एन. एन.महाविद्यालयाचे कला शाखेच्या ग्रामीण विकास विभागाने भिवंडी तालुक्यातील खारबाव ग्रामपंचायत येथे एक दिवसीय व्यवहारिक शिबिराचे आयोजन केले होते. अनोखा अनुभव झालेल्या या शिबिरात प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात उत्साहाने भाग घेतला होता.

या शिबिराचा प्राथमिक उद्देश विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन, स्थानिक समस्या, उपलब्ध सुविधा, आर्थिक उपक्रम आणि गावातील प्रत्यक्ष परिस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता. भिवंडी - वसई महामार्गावरील खारबाव ग्रामपंचायतीचे सरपंच महेंद्र पाटील यांच्या विशेष सहकार्याने हा उपक्रम यशस्वीरित्या




पूर्ण झाला. या वर्षी शिबिराचा मुख्य विषय "गाव सर्वेक्षण आणि आठवडा बाजार" होता. विद्यार्थ्यांनी गावाच्या पायाभूत सुविधांचे सविस्तर सर्वेक्षण केले, आठवडा बाजाराच्या आर्थिक रचनेचा अभ्यास केला आणि ग्रामीण व्यापाराच्या विविध उपक्रमांना बारकाईने समजून घेतले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी ग्रामीण विकासाचे महत्त्व, गावाच्या प्रगतीत तरुण पिढीची भूमिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज यावर मार्गदर्शन केले.ग्रामविकास विभागाचे प्रमुख डॉ.निनाद विजय जाधव यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल सरपंच आणि ग्रामपंचायत प्रशासनाचे आभार मानले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असे प्रत्यक्ष उपक्रम आवश्यक आहेत आणि भविष्यात असे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातील असे त्यांनी सांगितले.

# “माझा तलाव मोहीम" उपक्रमांतर्गत साळवी तलावावर रॅलीचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : पर्यावरण दक्षता मंडळाच्या “माझा तलाव मोहीम” उपक्रमांतर्गत सोमवारी ज्ञान प्रसारिणी शाळा, कळवा येथील इयत्ता आठवीच्या अ, ब आणि क तुकडीच्या विद्यार्थ्यांची साळवी तलाव येथे रॅली काढण्यात आली. साळवी तलाव येथे रॅली आयोजित करण्याच्या दहा दिवस आधी शाळेतील विद्यार्थ्यांना तलाव जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन केले आहे हे सांगून विद्यार्थ्यांकडून रॅली साठी लागणाऱ्या घोषवाक्य, घोषफलक बनवून घेण्यात आले. तसेच तलावाविषयी माहिती देण्यात आली.

रॅलीच्या सुरुवातीला आठवीच्या सर्व वर्गात जाऊन सूचना मुख्याध्यापक दीपक सुतार यांनी दिल्या. त्यानंतर पर्यावरण शाळा प्रकल्प व्यवस्थापक पौर्णिमा शिरगावकर यांनी पर्यावरण दक्षता मंडळाची ओळख करून देत तसेच उपक्रमाचे उद्दिष्ट पुन्हा एकदा स्पष्ट केले. त्यानंतर लगेचच सर्व विद्यार्थ्यांना रॅली साठी ओळीत उभे केले. शाळेतील परिसरात सर्व




विद्यार्थ्यांना घोषणाफलक देण्यात आले. त्यानंतर शाळेतून रॅलीची सुरवात झाली. शाळेतून बाहेर पडताच विद्यार्थ्यांनी माझा तलाव माझी जबाबदारी या घोषवाक्याने रॅलीची सुरवात केली. या रॅलीमध्ये गरज काळाची... जपणूक तलावांची, तलावाचे महत्व पटवा... पाण्याची चिंता मिटवा, दुष्काळाची नको आपत्ती..वाचवा कळव्याची जलसंपत्ती, तलाव स्वच्छ ठेवा... पक्ष्यांचं जीवन वाचवा, तलावाचे पुनर्भरण.. जीवधतेचे संवर्धन अशा नानाविविध प्रभावी घोषणां देण्यात आल्या. साळवी तलाव परिसरातील पोहचल्यानंतर विद्यार्थ्यांना तलावाची माहिती देण्यात आली. प्राचीन तलावांपैकी एक असलेल्या साळवी तलावाचे पर्यावरणीय आणि ऐतिहासिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. पूर्वी हा तलाव पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोत होता तसेच मत्स्यव्यवसायालाही हातभार लावत होता; सध्या मुख्यतः मासेमारीसाठीच त्याचा उपयोग केला जातो, याची माहितीही त्यांनी दिली. या शैक्षणिक रॅलीत ज्ञानप्रसारिणी शाळेच्या १०० हून अधिक विद्यार्थी, चार शिक्षक, एक शिक्षकेतर कर्मचारी, शाळेचे मुख्याध्यापक दीपक सुतार, पर्यावरण दक्षता मंडळाच्या पल्लवी बांदोडकर, पौर्णिमा शिरगावकर, मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्सचे जानवी कोरी आणि प्रीसि स्टिफन सहभागी झाले.

# अतितीव्र दिव्यांग व्यक्तींनी निर्वाह भत्ता योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** सन 2025-26 या वित्तीय वर्षामध्ये जिल्हा परिषदेने 5 टक्के जिल्हा परिषदेस दिव्यांग कल्याण निधीमधून दिव्यांग व्यक्तींसाठी नाविण्यपूर्ण योजना म्हणून "अतितीव्र दिव्यांग व्यक्तींना निर्वाह भत्ता देणे" या योजनेचा अर्थसंकल्पामध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार या योजनेसाठी लाभार्थी निवडी बाबतचे निकष, अटी व शर्ती आवश्यक कागदपत्रे इ. निश्चित करण्यात आल्या आहेत. योजनेसाठी विहित नमुन्यातील फॉर्म तयार करण्यात आलेले असून फॉर्म गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, गाव पातळीवर सर्व ग्रामपंचायतींमध्ये उपलब्ध आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी परिपूर्ण प्रस्ताव दि.31 डिसेंबर 2025 पूर्वी गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालयामध्ये सादर करावेत,असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढील प्रमाणे सर्व साधारण निकष असतील :- लाभार्थ्यांकडे दिव्यांगात्याचे प्रमाण 60 टक्के किंवा 60 टक्के पेक्षा जास्त असावे. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक/सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र धारक असावा. अर्जदाराकडे केंद्र शासनाच्या नवीन कायद्यानुसार दिव्यांगत्वाचे फक्त UDID प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. जुने इतर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही. लाभार्थी/दिव्यांग व्यक्ती हा ग्रामीण भागातील व रायगड जिल्हयातील रहिवासी असावा.(नगरपरिषद/म.न.पा. मधील नसावा), लाभार्थ्यांचे वय 18 वर्ष व त्यापेक्षा जास्त असावे. उत्पन्नाचा दाखला अथवा दारिद्रय रेषेखालील दाखला. (उत्पन्न मर्यादा 1 लाखाचे आत) कुटुंब दारिद्रय रेषेखालील असल्यास ग्रामसेवक किंवा गट विकास अधिकारी यांचा त्याबाबतचा संयुक्त दाखला, कुटुंब दारिद्रय रेषेखालील नसल्यास उत्पन्नाचा दाखला तहसिलदार यांच्याकडील आवश्यक आहे. (रेशनकार्ड झेरॉक्स/रहिवाशी दाखला/विद्युत बिलाची झेरॉक्स या पैकी 1) आधार कार्ड झेरॉक्स, बँक खाते पास बुक झेरॉक्स, UDID Card झेरॉक्स इ. सर्व प्रती सोबत जोडाव्यात, लाभार्थी शासकीय/निमशासकीय निवृत्ती वेतन (पेन्शन) धारक कर्मचारी नसावा. Form Down Load Link:- https://divyangkalyan.rzpapps.in/Web/mandate

# टिटवाळयातील मनसेच्या माजी नगरसेविका अपेक्षा जाधव यांचा शिवसेनेत प्रवेश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : टिटवाळा येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माजी नगरसेविका अपेक्षा जाधव यांनी रविवारी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्यासोबत मनसेचे मांडा–टिटवाळा उपविभागाध्यक्ष बंदेश जाधव यांनीही पक्षप्रवेश करत स्थानिक राजकारणात नवे समीकरण निर्माण केले. कल्याण शहर प्रमुख रवी पाटील यांच्या नेतृत्वाखाली, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईत झालेल्या कार्यक्रमात हा जाहीर प्रवेश झाला. २०१५ च्या केडीएमसी निवडणुकीत प्रभाग ८ मधून मनसेच्या तिकीटावर विजयी झालेल्या अपेक्षा जाधव यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करूनही सत्ता नसल्याने व निधीअभावी अपेक्षित विकासकामे करता आली नाहीत. म्हणूनच अखेर सत्ताधारी शिवसेनेत येण्याचा निर्णय घेत तसेच एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून आपण त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेच्या माध्यामातून जनतेच्या विकासाठी सदैव कार्यतत्पर राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

## भविष्यवेध



मंगळवार
०९ डिसेंबर २०२५

**मेष**
नवीन नोकरीची ऑफर मिळू शकते. कुटुंबातील सदस्यांशी समन्वय ठेवा. व्यावसायिकांना नफा मिळण्याची शक्यता आहे. गुंतवणुकीतून चांगले उत्पन्न मिळेल.

**वृषभ**
कामाच्या ठिकाणी काही आव्हानांना सामोरे जावे लागू शकते. तुम्ही तुमचा व्यवसाय वाढवण्यासाठी नवीन योजना बनवाल आणि या योजना यशस्वी होतील.

**मिथुन**
अनुभवी व्यक्तीची भेट होऊ शकते जी तुम्हाला मौल्यवान मदत करेल. तुमच्या व्यवसायात नफा होईल. कौटुंबिक कार्यक्रमात पैसे खर्च होऊ शकतात.

**कर्क**
सहकाऱ्यांसोबत तुमचे संबंध चांगले राहतील. तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत चांगला वेळ घालवाल. कौटुंबिक खर्च वाढतील.

**सिंह**
अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. तुम्ही सामाजिक कार्यांना पाठिंबा द्याल, ज्यामुळे समाजात तुमची प्रतिष्ठा वाढेल. वरिष्ठ कामाची प्रशंसा करतील.

**कन्या**
पगारवाढाची चांगली बातमी मिळू शकते. ज्यामुळे तुम्ही आनंदी राहाल. तुमच्या वरिष्ठांशी नीट, चांगलं. आदराने वागा. जिथे तुम्ही तुमची प्रतिभा दाखवाल.

**तुळ**
स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक मेहनत घ्यावी लागू शकते. महत्त्वपूर्ण फायदे मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक**
भागीदारी व्यवसायात समन्वय राहील. एखाद्याकडून आर्थिक फायदा मिळू शकतो. तुमचे सर्व काम पूर्ण होईल. कामावर एक महत्त्वाची जबाबदारी दिली जाऊ शकते.

**धनु**
जोडीदाराकडून तुम्हाला प्रेम आणि आदर मिळेल. आज घाईघाईने निर्णय घेणे टाळा. आध्यात्मिक कार्यांचा आनंद मिळेल. आरोग्याची काळजी घ्याल.

**मकर**
समाजसेवेसाठी एखाद्या स्वयंसेवी संस्थेत सामील होण्याचा विचार करू शकता. काही कठोर निर्णय घ्यावे लागू शकतात.नवीन क्षेत्रात करिअरची संधि मिळेल.

**कुंभ**
विद्यार्थ्यांना सर्जनशील कामांमध्ये अधिक रस निर्माण होईल. लांबचा प्रवास करावा लागण्याची शक्यता आहे, ज्यामुळे तुमच्या व्यवसायाला फायदा होईल. व्यवसायात

**मिन**
तुम्हाला मोठा फायदा होऊ शकतो. तुम्हाला तुमच्या क्षमता दाखवण्याची संधी मिळेल. सुट्टी असूनही कामामुळे धावपळ होईल.प्रगती होईल .

# भारत मंडपम् येथे सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव




## दुर्मिळ शिवकालीन शस्त्रप्रदर्शन संरक्षणतज्ज्ञांद्वारे देशाच्या सुरक्षेवर चर्चा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ऑपरेशन सिंदूर'सारख्या धाडसी मोहिमांपासून ते चौथ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता बनण्यापर्यंतचा प्रवास भारताने केला आहे; मात्र अलीकडेच दिल्लीतील बॉम्बस्फोट, तसेच देशांतर्गत लहान-लहान व्हॉइट कॉलर दहशतवादी गट कार्यरत करून हल्ल्याची योजना आखली जात असल्याचे समोर आले आहे. यातून देशाच्या अंतर्गत सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे देशविरोधी विदेशी शक्ती, डीप-स्टेट, नक्षलवाद, विघटनवादी, घुसखोरी, नॅरेटीव्ह युद्ध, लव्ह जिहाद, हलाल जिहाद आदी विविध माध्यमांतून भारताला खिळखिळे करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा वेळी दिखाऊ धर्मनिरपेक्षतेची नव्हे, तर भारतभूमीमध्ये पुन्हा एकदा प्रभु श्रीराम, श्रीकृष्ण, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या क्षात्रतेजाची नितांत आवश्यकता आहे. देशात पुन्हा सुरक्षा, संस्कृती आणि शौर्य यांचे जागरण होण्यासाठी भारताने विश्वकल्याणकारी 'सनातन राष्ट्र' म्हणून उभे राहणे अत्यावश्यक आहे. हाच संदेश देशभर पोहोचवण्यासाठी 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन' प्रस्तुत आणि 'सनातन संस्था' आयोजित भव्य 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' १३ व १४ डिसेंबर २०२५ या दिवशी नवी दिल्ली (इंद्रप्रस्थ) येथील 'भारत मंडपम्'मध्ये होणार असल्याची माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिली.

दिल्लीतील प्रेस क्लब ऑफ इंडिया येथे आयोजित पत्रकार परिदेषेत 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत'चे अध्यक्ष व भारताचे माजी माहिती आयुक्त श्री. उदय माहूरकर, हिंदु जनजागृति समितिचे मार्गदर्शक सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे, सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ती श्री. चेतन राजहंस, तसेच सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता अमिता सचदेवा हे उपस्थित होते.

सनातन संस्थेचे श्री. अभय वर्तक पुढे म्हणाले की, सनातन संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्ष, तसेच रामराज्यासम 'सनातन राष्ट्र' स्थापनेसाठी कार्यरत असलेले सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या जन्मोत्सवानिमित्त गोव्यात पहिला 'शंखनाद महोत्सव' झाला. त्याला २३ देशांतील ३० हजारांहून अधिक भाविकांचे अभूतपूर्व उपस्थिती, अनेक साधूसंत, गोव्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्र्यांची उपस्थिती लाभली व महोत्सव यशस्वीरित्या पार पडला. त्यानंतर आता दिल्लीत होणारा हा महोत्सव राष्ट्र आणि संस्कृती यांच्या रक्षणाचा शंखनाद करणारा असेल.

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी रामराज्यासमान आदर्श 'सनातन राष्ट्र' स्थापन करण्याचा पवित्र संकल्प केला आहे. महाभारत युद्धापूर्वी भगवान श्रीकृष्णांनी जसे धर्मयुद्धाचा शंखनाद केला, त्याचप्रमाणे हा महोत्सव धर्मनिष्ठ समाजातील आत्मशक्ती जागृत करून धर्मसेवा, राष्ट्रसेवेची प्रेरणा देणारा शंखनाद आहे.

दोन दिवसीय महोत्सवात 'सनातन संस्कृती संवाद', सांस्कृतिक-सामाजिक घडामोडी, राष्ट्रीय सुरक्षा, दहशतवाद-नक्षलवादाची पार्श्वभूमी, संरक्षणनीती आणि राष्ट्रबळ दृढ करण्याचे उपाय या महत्त्वाच्या विषयांवर विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ उद्बोधन करतील. दुसऱ्या दिवशी 'विश्वकल्याणकारी सनातन राष्ट्र' या विषयावर विशेष सत्र आयोजित करण्यात आले आहे.

**दुर्मिळ शिवकालीन शस्त्रप्रदर्शन :** दिल्लीतील भव्य अशा भारत मंडपम्मधील एक्झिबिशन हॉल क्रमांक '१२' मध्येही १३ ते १५ डिसेंबर २०२५ या तीन दिवसीय कालावधीत वैशिष्ट्यपूर्ण अशा 'शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन', तसेच 'सनातन संस्कृती', 'राष्ट्र, कला, आध्यात्मिक वस्तू' यांचे भव्य प्रदर्शनही लावण्यात येणार आहे. या प्रदर्शनीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील सुमारे २५० हून अधिक दुर्मिळ आणि ऐतिहासिक शस्त्रे दिल्लीमध्ये प्रदर्शित होत आहेत. हे प्रदर्शन सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत पाहता येईल. पारंपरिक आणि प्राचीन युद्धकलांचे रोमांचकारी प्रात्यक्षिकेही या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असेल.

या महोत्सवात अनेक संत-महंत, मान्यवर, विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती असणार आहे. त्यात श्रीराम जन्मभूमी न्यास कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेवगिरी महाराज, केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्री श्री. गजेंद्रसिंह शेखावत, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री श्री. संजय शेठ, केंद्रीय उर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक, दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री श्री. कपिल मिश्रा, छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. उदय ललित, संरक्षण तज्ञ श्री. संजय अग्रवाल, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य श्री. प्रियांक कानुनगो, 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत'चे अध्यक्ष व भारताचे माजी माहिती आयुक्त श्री. उदय माहूरकर, मेहंदीपुर बालाजी मंदिराचे प.पू. डॉ. नरेशपुरीजी महाराज, तसेच सनातन संस्थेच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ती (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ती (सौ.) अंजली गाडगीळ उपस्थित राहून मार्गदर्शन करतील. तसेच काशी-मथुरा मुक्तीसाठी लढणारे अधिवक्ता विष्णू शंकर जैन, सुदर्शन न्यूजचे प्रधान संपादक श्री. सुरेश चव्हाणके यांची उपस्थित असणार आहे. संतांचे आध्यात्मिक बळ आणि या मान्यवरांचे सामाजिक अन् राष्ट्रीय कार्य, यांचा त्रिवेणी संगम म्हणजे हा महोत्सव असेल.

या महोत्सवाची माहिती जाणून घेण्यासाठी, तसेच सहभागी होण्यासाठी SanatanRashtraShankhnad.in या संकेतस्थळावर जाऊन नाव नोंदणी करावी, तसेच कार्यक्रमस्थळी येतांना सोबत शासकीय ओळखपत्र आणावे, असे आवाहनही सनातन संस्थेकडून करण्यात आले.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका,ठाणे अनुभवी निविदाकारांकडुन "चरांचे पुर्नपृष्ठीकरण करणे या लेखाशिर्षका अंर्तगत " वागळे प्रभाग समिती अंर्तगत प्र.क्र.१७ ड मधील रस्ता क्र.२२ येथे ड्रेनेज लाईन टाकलेल्या रस्त्यांचे पुनर्पृष्ठीकरण करणेच्या एक कामांसाठी ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https:// mahatenders.gov.in/ येथे दि.०९/१२/२०२५ ते दि.१६/१२/२०२५ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि. १६/१२/२०२५ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि. १८/१२/२०२५ रोजी १६.०० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/९९२/२०२५-२६ सही/-
दि:८.१२.२०२५ नगर अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**


# कल्याणमध्ये कुणबी समाजाचा वधु - वर मेळावा संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**टिटवाळा :** कुणबी समाज प्रतिष्ठान ही कल्याणमध्ये शेतकरी कुणबी समाजासाठी विधायक काम करणारी सामाजिक संस्था असून संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र पाटील व वधुवर मंडळाच्या अध्यक्षा साक्षी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कुणबी समाज बांधवांसाठी रविवार (ता 7) ला भोईरवाडी मधील सिद्धिविनायक हॉल मध्ये उपवर मुला मुलींचा वधुवर परिचय मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.दिवसभर चाललेल्या या मेळाव्यात जवळपास ठाणे, रायगड , पालघर जिल्ह्यातील 650 वधुवर पालकांनी सहभाग घेतला 122 उच्च शिक्षीत वधूवरानी व्यासपीठावर येऊन आपला परिचय करून दिला.कार्यक्रमाची सुरुवात भजन सम्राट रामचंद्र भोईर यांच्या ईशस्तवन, स्वागत व लग्न गीताने झाली त्यामुळे या मेळाव्यात लग्न सोहळ्याचे मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमासाठी मुंबईतील व कल्याण मधील कुणबी उद्योजक,ठाणे, भिवंडी , शहापूर, वाडा पालघर,कुणबी समाजसेवा संघाचे पदाधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक सचिव प्रमोद निपुर्ते यांनी केले तर अध्यक्ष जितेंद्र पाटील,व साक्षी पाटील यांनी वधुवर व पालकांना आपल्या भाषणातून मार्गदर्शन केले.


**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, शिक्षण विभाग, कल्याण**

पहिला मजला, झोझवाला शॉपिंग कॉम्प्लेक्स, रामदेव हॉटेलच्या मागे, सहजानंद चौक, कल्याण (प)-421301

ई-मेल - ssakdmc@yahoo.co.in, ssa.kdmc@gmail.com

**शिक्षणाचा अधिकार**

पुण्यश्लोक 300

**निविदा सुचना क्रमांक - ११/२०२५-२०२६**

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांची आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीकरिता आवश्यक सेवा सुविधा पुरविणेसाठी ई-निविदा**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या इयत्ता ३ री ते ८ वी च्या अंदाजे 5300 विद्यार्थी व 100 शिक्षक असे एकूण 5400 व्यक्तींची (अंदाजे प्रति दिन 500 व्यक्ती - 11 दिवसांसाठी) आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीसाठी नेहरु तारांगण व नेहरु सेंटर येथील प्रवेश फी (शो तिकीट), कल्याण ते मुंबई (परतीचा प्रवास) या प्रवासाकरिता एसटी महामंडळ यांचे बसेस सुविधा (भाडे तत्वावर विदयार्थ्यांचे विमा संरक्षणासह) उपलब्ध करुन घेणे, विदयार्थ्यांना व शिक्षकांना अल्पोहार / जेवण व्यवस्था तसेच विदयार्थ्यांना प्रवासाची सवय नसल्याने त्यांचे आरोग्याच्या दृष्टिने काळजी घेणेसाठी आवश्यक असणारी किरकोळ साम्रगी/साहित्य इ. करिता सेवा सुविधा पुरविणेसाठी अनुभवी संस्था/कंपनी/ सेवा पुरवठादार यांचेकडून ई-टेंडर पध्दतीने देकार मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | निविदेची अंदाजित रक्कम | अनामत रक्कम | निविदा अर्जाची रक्कम (जीएसटीसह) |
|---|---|---|---|---|
| १ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांची आयोजित शैक्षणिक सहलीकरिता आवश्यक सेवा सुविधा पुरविणे | 29,98,900/- | 95000/- | 6726/- |

1) निविदा प्रक्रिया http://www.mahatenders.gov.in वर ऑनलाईन प्रक्रियेद्वारे राबवण्यात येत आहे.
2) निविदेचे वेळापत्रक, तपशील, साहित्याचे वर्णन, फी इत्यादी निविदा फी पाहण्यासाठी निविदाकरिता कृपया http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.
3) निविदा दि. ०९/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दिनांक १६/१२/२०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्जाची खरेदी करुन भरता येईल.
4) सदर http://www.mahatenders.gov.in वर निविदेचा तांत्रिक लिफाफा दिनांक १७/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदा धारकाच्या / प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडण्यात येईल.
5) एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखुन ठेवलेले आहेत.

सही/-
(संजय जाधव)
उप आयुक्त (शिक्षण)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

जा. क्र कडोंमपा/जसंवि/मुका/ ७६३
दिनांक :- ०८/१२/२०२५


# टायगर ग्रुप पोलीस मित्र संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** टायगर ग्रुप पोलीस मित्र संघटना महाराष्ट्र मुंबई कल्याण या संघटनेची बैठक कल्याण पूर्वेत पार पडली. या ठिकाणी कल्याण पश्चिम, उल्हासनगर शहर व कल्याण जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.



यावेळी संस्थापक अध्यक्ष महेश फडतरे, कार्याध्यक्ष अक्षय मोगरे, उपाध्यक्ष प्रवीण पवार, मुंबई अध्यक्ष शेखर कदम, कल्याण डोंबिवली जिल्हा अध्यक्ष मनोज नायर, उपाध्यक्ष प्रदीप साळवी, सरचिटणीस श्याम भोळे, सोशल मीडिया प्रमुख विकी कसोटीया, रीना सोनवणे, बाळा बनसोडे, गौतम सोनवणे, देवबा सूर्यवंशी, समर्थ माशाळ यावेळी उपस्थित होते.

# टिटवाळ्यात 'मियावाकी' पद्धतीने 30 हजार झाडांचे हरित जंगल राहणार उभे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**टिटवाळा :** टिटवाळा पूर्व येथील इंदिरानगर स्मशानभूमी परिसर हिरवाईने नटणार आहे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL) या कंपनीने आपल्या CSR निधीतून पहिल्या टप्प्यात तब्बल ३० हजार झाडांची लागवड करून मियावाकी पद्धतीचे घनदाट हरित जंगल उभारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. या वृक्षारोपणाची तीन वर्षे निगा राखण्याची जबाबदारी देखील कंपनी स्वीकारणार आहे. या मियावाकी जंगल प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचा शुभारंभ मंगळवार, दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन होणार असून अतिरिक्त आयुक्त, शहर अभियंता, BPCL चे वरिष्ठ अधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.हवामान बदल, वाढते प्रदूषण आणि कमी होत चाललेले हिरवे क्षेत्र यामुळे पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक भासू लागली आहे. अशा पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेला हा उपक्रम टिटवाळा शहरासाठी नवे पर्यावरणीय फुफ्फुसे ठरणार आहेत.

# यूपीएससी मुख्य परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांकिरीता मॉक इंटरव्हिव्यूचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**ठाणे :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) मुलाखतीचे व त्यामध्ये यश संपादन करण्याबाबत विद्यार्थ्यांवर प्रचंड दडपण असते. शिवाय अनेक विद्यार्थ्यांमध्ये मुलाखतीच्या भीतीने नैराश्य निर्माण होते. त्याअनुषंगाने UPSC च्या स्पर्धा परीक्षेत मुलाखतीस यशस्वीपणे सामोरे जाण्याकरीता व विद्यार्थ्यांमधील मुलाखतीबाबत असलेली भिती दूर करणेकरीता ठाणे महानगरपालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमार्फत मॉक इंटरव्हिव (MOCK-INTERVIEW) चे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

या मुलाखतीच्या सत्रात ठाणे महानरगपालिकेचे आयुक्त सौरभ राव (भाप्रसे), अणु ऊर्जा विभागाचे संचालक डॉ. नितीन जावळे (भाप्रसे), राज्य गुप्तचर विभाग, रेल्वे, मुंबईचे सहआयुक्त डॉ. रविंद्र शिसवे (IPS), माहिती अधिकार मुंबईचे आयुक्त शेखर चन्ने (भाप्रसे), केंद्रीय उत्पादन शुल्क आणि केंद्रीय कर,गुजरातचे प्रधान आयुक्तसुरेंद्र मानकोसकर (भामसे), अश्विनी आडिवरेकर (भामसे), कस्टमचे उपआयुक्त अक्षय पाटील (IRS), मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ मृदुल निळे, UPSC आणि MPSC तज्ज्ञ मार्गदर्शक यांनी परीक्षणार्थींच्या मॉक इंटरव्हिव्यू (MOCK-INTERVIEW) घेतल्या.

सदर सत्रात उपरोक्त अनुभवी व तज्ज्ञ परीक्षकांनी मॉक इंटरव्हिवकरिता आलेल्या विद्यार्थ्यांची मुलाखत घेतली केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) मुलाखतीकरिता कोणत्या बाबी आवश्यक आहेत? विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे कशा पध्दतीने द्यावीत? तसेच Mock Interview मध्ये दिलेल्या उत्तरांमध्ये कशा पध्दतीत बदल केला पाहिजे? बॉडीलॅंग्वेज कशा पध्दतीने हवी? आयकॉन्टॅक्ट कसा असला पाहिजे? व इतर अनेक बाबींबाबत सखोल असे बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच, संस्थेमार्फत सदर मुलाखतीचे अत्याधुनिक पध्दतीने विडीयो रेकॉर्डींग करण्यात आलेले असून, सदरचे विडीयो रेकॉर्डींग विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे, जेणेकरुन मुलाखतीत झालेल्या चुकांचे विद्यार्थ्यांना योग्य वेळेत मूल्यमापन करता येईल. महाराष्ट्रातील एकुण 25 विद्यार्थ्यांचे DAF-2 अवलोकन करून, संस्थेच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून सदर DAF-2 चे ANALYSIS करून त्याआधारे प्रश्नावली तयार करून, मुलाखतीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

20 डिसेंबर रोजी पुन:श्च मॉक इंटरव्हिव्यू शनिवार दिंनाक 20 डिसेंबर 2025 रोजी चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमार्फत पुन:श्च मॉक इंटरव्हिवचे (MOCK-INTERVIEW) आयोजन करण्यात आलेले आहे. सदर मुलाखत पॅनलमध्ये के.पी. बक्षी (IAS) सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य सचिव - महाराष्ट्र शासन, डॉ. शैलेंद्र मिश्रा (IPS) DIG, NIA Branch Office Mumbai , मोक्षदा पाटील (IPS) Deputy Inspector General Of Police – Mumbai, स्वप्नील थोरात (IFS) , प्रतीती गोयल (IRS) Deputy Commissioner At Indian Reveunue Service - Mumbai, नेहा निकम (IRS), अभिजीत थोरात (IRS), श्री. भुषण देशमुख, UPSC आणि MPSC तज्ज्ञ मार्गदर्शक इत्यादी मान्यकरांचा समावेश करण्यात आलेला आहे. जे विद्यार्थी दिनांक 20 डिसेंबर 2025 रोजी मॉक इंटरव्हिवकरिता (MOCK-INTERVIEW) इच्छुक आहेत, अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे DAF-2 संस्थेच्या www.cdinstitute@thanecity.gov.in या ईमेल आयडीवर अपलोड करावे. अधिक माहितीकरीता संस्थेच्या 25881421 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखतीबाबत मार्गदर्शन हवे असल्यास, संस्थेचे संचालक याचेंशी व संस्थेच्या मुख्य केंद्रास त्वरीत संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे संचालक महादेव जगताप यांनी केले.

ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (1) संदिप माळवी, उपआयुक्त सचिन सांगळे आणि संचालक महादेव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा कार्यक्रम यशस्वी करणेकरीता चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी/ कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतलेली आहे.

# लाखोंच्या हिऱ्यांची चोरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** बोरीवली पश्चिमच्या मनुबाई जेम्स प्रायव्हेट लिमिटेड या ज्वेलर्सच्या एच.एल. हाउस या क्वालिटी कंट्रोल ऑफिसमध्ये काम करणाऱ्या विजय विश्वास (४८) याने दोन लाख रुपये किमतीचे हिरे चोरून नेले. या प्रकरणी सुमित जैन (३६) या वित्तीय सल्लागाराच्या तक्रारीवरून बोरीवली पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा नोंदविला आहे.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित

**सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा** मुंबई विद्यापीठाशी संलग्न

ADMISSION OPEN 2025-26




११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE

UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS

POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY

7038658191
9130580111


# कल्याणमध्ये 36 तासांच्या अखंड वाचनयज्ञात 2452 वाचकांचा सहभाग

## वाचनामुळे विचारांमध्ये सुसूत्रता येते - सारिका कुलकर्णी

**वाचन जाणिवा समृद्ध करते. इतर माध्यमांपेक्षा वाचनामध्ये अनेक गोष्टींचे वेगळेपण आढळते. स्मरणशक्ती व निरीक्षणशक्ती वाचनामुळे वाढीला लागते तसेच वाचनामुळे शब्दसंपत्ती वाढीला लागून आपल्या भाषेचे सौंदर्य वाढते. तसेच वाचनामुळे सुसूत्रपणे विचार करण्याची शक्ती वाढीस लागते, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका सारिका कुलकर्णी यांनी केले. अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानचे वतीने आयोजित सलग ३६ तास चाललेल्या अखंड वाचन यज्ञाचे समारोपवेळी त्या बोलत होत्या.**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** - युवकांना वाचनाकडे वळवण्यासाठी, त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी, साहित्यिकांबाबत माहिती मिळावी, तसेच समोर येऊन बोलण्याची भीती कमी व्हावी यासाठी अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानचे वतीने राबवण्यात आलेल्या ३६ तासांच्या अखंड वाचनयज्ञात २४५२ वाचकांचा सहभाग दर्शवला.

कल्याण येथील अक्षरमंच सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने विविध सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जात असतात. ही संस्था मागील ३ वर्षांपासून अखंड वाचनयज्ञ उपक्रम राबवित आहे. या उपक्रमात अभिवाचन, काव्यवाचन, लेख, ऐतिहासिक कथा, भयकथा अशा विविध साहित्य आणि साहित्यिकांच्या साहित्याची वाचन सत्रे आयोजित केली जातात. पहिल्या वर्षी या उपक्रमात ११०० वाचक सहभागी झाले होते. तर दुसऱ्या वर्षी १६७८ वाचकांनी या वाचनयज्ञात सहभाग नोंदवला होता. यंदा, या वाचनयज्ञात ६ ते ८२ अशा विविध वयोगटातील २४५२ वाचकांनी भारताचार्य चिंतामणराव वैद्य वाचन कट्टा, डॉ जयंत नारळीकर वाचनकट्टा, बाळ कोल्हटकर वाचनकट्टा या व्यासपीठावरून वाचन केले.

> **डोळ्यांना चष्मा लागतो, पण दृष्टीला कधी चष्मा लागत नाही. सजग डोळ्यांनी आपण आपल्या आसपास घडणाऱ्या घटनांकडे पाहिल्या पाहिजे आणि ही दृष्टी वाचनामुळे आपल्याला मिळते. मराठी भाषेचे भविष्य धूसर नाही, हे अखंड वाचन यज्ञ सारख्या उपक्रमांमुळे सिद्ध झाले आहे असे मत ज्येष्ठ कवी अशोक बागवे यांनी व्यक्त केले.**

३६ तासांचा अखंड वाचनयज्ञ ६५ सत्रांमध्ये पार पडला. या उपक्रमांत २० सामाजिक व सांस्कृतिक संस्था आणि २६ शाळांचा सहभाग होता. या उपक्रमात मराठी भाषेप्रमाणे हिंदी, इंग्रजी, गुजराती, आगरी-कोळी, अहिराणी अशा विविध भाषा आणि बोलीतील कथा, कविता, एकांकिका, स्फुटलेखन यांचे वाचन करण्यात आले. उपक्रमातील वाचन आस्वाद घेण्यासाठी विविध सत्रांमध्ये रसिक आणि विद्यार्थी वाचनयज्ञातील विविध कट्ट्यांवर उपस्थित होते.

# महापरिनिर्वाणदिनानिमित्त रिपब्लिकन सेनेतर्फे अभिवादन सभा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशान्वये सालाबादप्रमाणे याहिवर्षी महामानव, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त लाखो भिमअनुयायी चैत्यभूमी दादर येथे दर्शनासाठी येत असतात. त्यांच्या व्यवस्थेकरीता हजारो भिमअनुयायांसाठी छत्रपती शिवाजी पार्क, दादर येथे कल्याण डोंबिवली रिपब्लिकन सेना शाखेतर्फे मोफत भोजनदान वाटप करण्यात आले होते. कल्याण पूर्व अध्यक्ष बाबु तलाठी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या प्रसंगी कार्यक्रमाकरिता कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष आनंद नवसागरे, कल्याण डोंबिवली जिल्हा महिला अध्यक्ष ललिता आखाडे, कल्याण शहर अध्यक्ष दामू काऊतकर, महिला अध्यक्ष रेखा गोडबोले, कल्याण डोंबिवली शहर सचिव विनोद रोकडे, जिल्हा संघटक युवराज वाटुरे, डोंबिवली शहर संघटक नितीन साबळे, प्रतिष सोनवणे, रोहित जाधव, राहुल जाधव, राहुल भवार,



जितू अहिरे, रवींद्र रोकडे, संजय चंदने, अंकुश साबळे, पंडित जगताप, विनोद थोरात आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम झाल्यानंतर शेकडो कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी पार्क मधील अभिवादन सभेस हजेरी लावून कार्यक्रम संपन्न झाला.

# कवी नारायण सुर्वे जन्म शताब्दी निमित्त साहित्य गौरव ग्रंथाचे प्रकाशन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** कामगार चळवळ आणि त्याअनुषंगाने कवितेचे वेगळे विश्व निर्माण करणारे कवी नारायण सुर्वे यांच्या जन्म शताब्दी वर्षाचे निमित्ताने त्यांच्या साहित्याचा प्रवास विषद करणारा गिरीश कंटे संपादित एक गौरव ग्रंथ लवकरच प्रकाशित होत आहे.

आपल्या कवितेची वेगळी वाट चोखाळणारे कवी नारायण सुर्वे यांनी मराठी साहित्यात वेगळे वलय प्राप्त केले आहे. उद्याच्या त्यांच्या साहित्याची माहिती मिळावी ह्या उद्देशाने पीपल्स पब्लिकेशन मुंबई आणि स्वातंत्र्य सैनिक गोमाजी रामा पाटील प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. पीपल्स पब्लिकेशन मुंबई चे प्रकाशक प्रा. हरेंद्र सोस्टे आणि प्रतिष्ठान चे अध्यक्ष कल्पेश भोईर यांच्या नियोजन समितीच्या वतीने प्रकाशित होत असलेल्या ह्या ग्रंथात महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखकांचे तसेच नवोदित लेखकांचे लेख असणार आहेत. कवी अरुण म्हात्रे,प्रा,अशोक बागवे, डॉ.महेश केळुस्कर,प्रा.प्रवीण दवणे,प्रा.प्रशांत मोरे,कवी तुकाराम धांडे,प्रा.सुरेश अत्रे, प्रा, डॉ.प्रदीप ढवळ, प्रा.भाग्यश्री कुडूक यांच्यासह ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील अनेक लेखकांचे लेख असणार आहेत. हा ग्रंथ जानेवारी महिन्यात जीवनदीप कॉलेज गोवेली येथे भव्य स्वरूपात प्रकाशित होत आहे असे जीवद्ददीप संस्थेचे अध्यक्ष प्रा.रवींद्र घोडविंदे यांनी सांगितले.

# पत्रकार अविनाश उबाळे यांना पितृशोक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** शहापूर तालुक्यातील भुमीपुत्र व वनविभागातुन सेवानिवृत्त झालेले वनअधिकारी व पत्रकार अविनाश उबाळे यांचे वडील आण्णा उबाळे यांचे निधन झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

सर्वानां सुपरिचीत असलेले व शहापुर तालुक्यातील बेडीसगांव येथील भुमीपुत्र असलेले वनविभागातील निवृत्त वन परिमंडळ अधिकारी अण्णा शंकर उबाळे यांचे बुधवार दिनाक ३ डीसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले मृत्यूसमयी त्यांचे वय ७४ वर्ष इतके होते.नोकरी निमित्ताने ते गेली अनेक वर्षे शहापूर येथे वास्तव्यास होते.दिवगंत आण्णा उबाळे यांचा स्वभाव अंत्यंत,प्रेमळ व मनमिळाऊ होता. वनविभागात नोकरी करताना अगदी प्रामाणिकपणे त्यांनी आपले कर्तव्य बजावले. त्यांच्या मितभाषी, स्वभावामुळे विविध समाजातील नागरीकांशी व कुंटुबातील सदस्य, नातेवाईकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते..त्यांच्या पश्चात मुलगा, मुली,सुन,नातवंडे जावई असा मोठा परिवार असुन पत्रकार अविनाश उबाळे यांचे ते वडील होते. शहापूर येथील गंगा देवस्थान स्मशानभूमीत अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आंबेडकर चळवळीतील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर,पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.१४ डीसेंबर रोजी वारघडे नगर शहापुर येथील राहत्या घरी दिवंगत आण्णा उबाळे यांचा जलदान विधी कार्यक्रम होणार आहे.

# वाहतूक पोलिसांनी दिले रिक्षा आणि टॅक्सी चालकांना वाहतुकीच्या नियमाचे धडे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** सध्या ठाणे शहरात रिक्षा व टॅक्सी चालकांच्या अनेक तक्रारी निर्माण होताना दिसत आहेत. यामध्ये चालकांची कसल्याही प्रकारची चूक नसताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यामधून मार्ग काढण्यासाठी शिव परिवार रिक्शा–टॅक्सी चालक समितीच्यावतीने संस्थापक ॲड. विनय कुमार सिंह यांच्या नेतृत्वाखाली दि.07 डिसेंबर 2025 रोजी रायला देवी, तलाव, वागळे इस्टेट ठाणे येथे शेकडो रिक्शा–टॅक्सी चालकांसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ठाणे वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ आणि पोलिस निरीक्षक सुभाष कोकणे यांनी उपस्थित राहून चालकांना रस्ते सुरक्षा, ब्लाइंड स्पॉट्सपासून बचाव, चुकीच्या दंडांचे निवारण, आगामी लोक अदालतीतील प्रक्रिया सह वाहतूक सुरक्षेबाबत महत्त्वाच्या सूचना देऊन मार्गदर्शन केले.

सर्व चालक बांधवांनी शिस्त, सुरक्षा आणि कायद्याचे पालन करण्याची वाहतुक शपथ घेतली. यावेळी शिवदूत चालक प्रवाशांचे कोणतीही गैरसोय न करता वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करतील. असे ॲड. विनय कुमार सिंह यांनी प्रशासनाला आश्वासन दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरविंद गिरी, दिलीप सिंह, आशीष सिंह, मनोज सिंह आणि अशोक गिरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कुष्ठरुग्ण शोध मोहीमेची ठाणे जिल्ह्यात यशस्वी अंमलबजावणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** केंद्र व महाराष्ट्र शासनाने सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसार साध्य करण्याचे ध्येय जाहीर केले असून त्यानुसार संपूर्ण राज्यभर कुष्ठरुग्ण शोध मोहीम राबविण्यात आली. या अनुषंगाने ठाणे जिल्ह्यातही ही मोहीम जिल्हाधिकारी ठाणे डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे पार पडली. ग्रामीण भागामध्ये १०० टक्के तसेच जोखीमग्रस्त शहरी भागांमध्ये मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेचा मुख्य उद्देश समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण शोधणे, त्यांना त्वरित बहुविध औषधोपचार (MDT) सुरू करणे, नवीन सांसर्गिक रुग्णांमुळे होणारी संसर्गाची साखळी खंडित करणे आणि जनजागृतीद्वारे कुष्ठरोगाविषयीची भीती व गैरसमज दूर करणे हा होता. सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसार साध्य करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. मनीष रेंगे यांनी सांगितले.

कुष्ठरोगाची लक्षणे ओळखणे अत्यंत महत्त्वाचे असून त्वचेवर फिकट अथवा लालसर बधिर चट्टे, त्या ठिकाणी घाम न येणे, त्वचेवर गाठी, कानाच्या पाळ्या जाड होणे, भुवया विरळ होणे, तळहात व तळपायांमध्ये मुंग्या किंवा बधिरपणा, हातांचे किंवा पायांचे बोटे वाकडी होणे, संवेदनांचा अभाव, चालताना चप्पल गळणे, वस्तू हातातून पडणे अशी लक्षणे आढळू शकतात. अशा लक्षणांवर त्वरित उपचार न झाल्यास विकृती निर्माण होऊ शकते, त्यामुळे लवकर निदान अत्यंत आवश्यक आहे.

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात या मोहिमेदरम्यान एकूण १ हजार ५८ टीमच्या माध्यमातून १३ लाख ९५ हजार ७३८ लोकांची तपासणी करण्यात आली. आरोग्य कर्मचाऱ्यांनी ३ लाख ३४ हजार ७१५ घरभेटी दिल्या. तपासणीमध्ये ७ हजार ३९२ संशयित रुग्ण आढळले, त्यापैकी ६,०७८ जणांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आणि १०५ नवीन कुष्ठरुग्ण निदान झाले. ग्रामीण भागातील तालुकानिहाय आकडेवारीनुसार अंबरनाथ, मुरबाड, शहापूर, भिवंडी आणि कल्याण तालुक्यांमध्ये सर्वाधिक लोकसंख्या कव्हर करण्यात आली असून शहापूर व भिवंडी तालुक्यांत सर्वाधिक निदान झालेल्या प्रकरणांची नोंद झाली.

जिल्ह्यातील महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रांमध्ये २ हजार ४३१ टीममार्फत ९ लाख २२ हजार ९६० घरांना भेटी देण्यात आल्या व ३९ लाख ८० हजार २५८ नागरिकांची तपासणी करण्यात आली. त्यामधून २४ हजार २३९ संशयित रुग्ण आढळले. त्यापैकी २० हजार ९५६ जणांची तपासणी केल्यानंतर ८५ नवीन कुष्ठरुग्णांचे निदान झाले. जिल्ह्यामध्ये ग्रामीण, शहरी, महानगरपालिका, नगरपालिका पकडून एकूण १८६ कुष्ठरुग्ण आढळले आहेत.

ही संपूर्ण मोहीम आरोग्य विभाग, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालये, महापालिका आरोग्य विभाग, आशा सेविका, आरोग्य सहाय्यक, स्वयंसेवी संस्था व स्थानिक प्रशासन यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली. कुष्ठरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो आणि त्यावर मोफत औषधे उपलब्ध आहेत, हे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात या मोहिमेचा मोठा वाटा ठरला आहे.

# जीवनदीप महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी स्वयंम सुरक्षिततेचे धडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली :** समाजामध्ये महिला वरील वाढते गैरप्रकार तसेच त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी;जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे सोमवार दिनांक ८-१२-२०२५ रोजी महिला विकास मंच (डब्ल्यू डीसी) आणि माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी स्वयं सुरक्षितता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

माजी विद्यार्थ्यांनी ही संकल्पना राबवली; मुलींनी आजच्या काळात स्वतःचे संरक्षण कसे करावे या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते . या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी कु. रामबरण यादव ,कु. विशाखा तरे व इतर सहकारी उपस्थित होते.



विद्यार्थ्यांनीना प्रात्यक्षिके दाखवून आलेल्या संकटांवर कशाप्रकारे मात करता येईल याचे योग्य प्रशिक्षण विद्यार्थ्यांनीना दिले. महाविद्यालयाचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे , प्राचार्य. डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे यांचे मार्गदर्शन सदर कार्यक्रमाला लाभले. महिला विकास मंच प्रमुख. प्रा.मीना मुळीक, , माजी विद्यार्थी संघाच्या प्रमुख. प्रा. जया देशमुख , राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. दिनेश धनगर, सर्व महिला प्राध्यापिका, विद्यार्थिनी यांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला हजेरी लावली व प्रशिक्षणाचा लाभ घेतला. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या सहकार्याने सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

### स्वस्थ भारत योग केंद्रांतर्फे आयोजित

# रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**कल्याण :** स्वस्थ भारत योगा केंद्रातर्फे उल्हासनगर येथे आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दि.०७ डिसेंबर २०२५ रविवार रोजी सदर रक्तदान शिबिर स्वस्थ भारत योगा केंद्र व संकल्प ब्लड सेंटर यांच्या मदतीने राजाविर मंदीर, उल्हासनगर-३ येथे आयोजित करण्यात आले. योगाचार्य विश्वासराव मंडलिक यांच्या वाढदिवसानिमित्त सदर रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. सुरवातीलाच संस्थापक प्रदीप होटवानी यांनी योग साधकांचा ध्यानधारणेचा अभ्यास घेतला आणि तद्नंतर रक्तदान शिबिराला सुरवात झाली. सकाळपासूनच रक्तदात्यांची येथे रीघ पहावयास मिळाली. प्रत्येक कार्यकर्ता रक्तदान करण्यासाठी आलेल्या रक्तदात्यांना अर्ज भरण्यापासुन मार्गदर्शन करीत होता, त्यामुळे कुठेही घाईगडबड न होता रक्तदान सुरळीत पार पडले. एकुण २५३ रक्तदात्यांनी येथे रक्तदान केले. स्वस्थ भारत योगा केंद्राचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप होटवानी यांनी रक्तदात्यांचे व संकल्प ब्लड सेंटर यांच्या डॉक्टर व कर्मचारी वर्ग यांचे आभार मानले.

# कल्याण डोंबिवली मध्ये हवेतील प्रदुषण वाढले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात हवेचे प्रदुषण वाढले असल्याने याला प्रशासन आवर कसा घालणार, हवेचे गुणवत्ता सुधारणा संबंधी प्रभावी उपाययोजना कधी राबविणार असा प्रश्न पर्यावरण जाणकराकडून होत आहे.

कल्याण डोंबिवली शहराचे वाढत्या शहरीकरणामुळे बाधंकामाचा वेग पाहता आणि रिडेव्हलमेन्ट खालील जुन्या इमारतीची पाडकामं, वाढती वाहनांची वाहतूक कल्याण डोंबिवली शहरात सुरू असलेली विविध पायाभूत सुविधा कामे पाहता, यावर केडीएमसी प्रशासनाचे दुर्लक्ष आणि दिवाळी सणानंतर हवेची खालवली गुणवत्ता पातळी पाहता डेजंर झोन ओलांडून अति डजेंर झोन मध्ये गेल्यानंतर केडीएमसी प्रशासन जागे होणार का असा सवाल नागरिक करत आहेत. हवेच्या कल्याण-डोंबिवलीमध्ये हवा प्रदूषणाची समस्या वाढत असल्याने, ज्यामुळे नागरिक श्वसनांच्या आजारांनी त्रस्त होत आहेत. यावर उपाय म्हणून, केडीएमसीने पर्यावरणाचे संरक्षण



करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित केले आहेत, पण प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी ठोस कृतीची गरज आहे.

सध्या कल्याणचा हवेचा दर्जा (AQI) नोव्हेंबर मध्ये 1नोव्हेंबर रोजी 41 होता. तर 10 नोव्हेंबरला 212 'अस्वास्थ्यकर' श्रेणीत होता. तर 30 नोव्हेंबर ला 145होता. तर 4 डिसेंबर ला 136 इतका असून कल्याण डोंबिवली क्षेत्रात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडाळाने हवेतील गुणवत्ता मोजण्यासाठी एअर कॉलीटी मॉनेटेरिंग मशीन खडकपाडा ब प्रभाग क्षेत्र कार्यालय, आणि पिंपळेश्वर महादेव मंदिर मानपाडा डोंबिवली येथे बसविल्या आहेत. या मशीन द्वारे हवेची गुणवत्ता समजली जाते. कल्याणचा एअर क्वालिटी सद्यस्थितीत इंडेक्स (AQI) (136) आहे, जो 'अस्वास्थ्यकर' श्रेणीत येतो. केडीएमसीने हवेतील प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे.,अन्यथा हवेतील प्रादुषण हा नागरी आरोग्य जीवनाला हनिकारक होईल असे यानिमित्ताने दिसत आहे. तर महाराष्ट्र प्रादुषण महामंडळाने कारवाईचा बडगा उगरित कल्याण मधील एका आरएमसी प्लान्टवर बंदी घातली असली तरी हवेतील प्रदुषण रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्यासाठी प्रभवी अमंलबजावणी केडीएमसी प्रशासन केली पाहिजे अशी मागणी यानिमित्ताने जोर धरू पाहत आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या आयोजनाखाली पॉवर स्वीपर मशीन 4 गाड्यांच्या मार्फत रात्रीच्या वेळेस मुख्य रस्त्यावर धुळ शमनसाठी कार्यरत असल्याचे वाहन विभागाचे अधिकारी प्रविण पवार यांनी माहिती दिली. तर कल्याणातील बालरोग तज्ञ डॉक्टर सोनली पाटील यांनी हवेतील प्रदुषणामुळे श्वसनाचे विकार असणाऱ्यांनी काळजी घ्यावी, तसेच बाहेर जाताना मास्कचा वापर करावा जेणेकरून धुळीपासून होणाऱ्या ॲलर्जी टाळता येईल. सर्दी पडसे, तव्वा अलर्जी झाल्यास दुर्लक्ष न करता औषध उपचार वेळीच करणे गरजेचे आहे.

# तीन दिवस ठाणे शहरात 30 टक्के पाणी कपात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पिसे बंधारा येथून टेमघर जलशुद्धीकरण केंद्राकडे पाणी वाहून आणणारी 1000 मि. मि व्यासाची जलवाहिनी कल्याण फाटा येथे महानगर गॅस च्या कामांमध्ये शनिवार दि. ६. १२. २०२५ रोजी सकाळी नादुरुस्त झाली आहे. पाणीपुरवठा विभागामार्फत जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम मागील दोन दिवसापासून सुरू आहे परंतु जलवाहिनी जुनी व प्रिस्ट्रेस कॉंक्रीट पद्धतीची असल्यामुळे दुरुस्तीच्या कामासाठी आणखी तीन दिवस वेळ लागण्याची शक्यता आहे. या कारणास्तव ठाणे शहराकडे येणारा पाणीपुरवठा कमी झाला असून शहरांमध्ये 30 टक्के पाणी करण्यात लागू करण्यात येत आहे. शहरामध्ये पाणी वितरणाचा समतोल ठेवण्यासाठी दिनांक 11/12/2025 पर्यंत झोनिंग पद्धतीने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना कमी प्रमाणात व अनियमित पाणीपुरवठा होईल. नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा व महापालिकेत सहकार्य करावे असे आवाहन पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे.

# सचिन तेंडुलकर यांच्या कारकीर्दीतले विविध वृत्तपत्रातील कात्रण संग्रहाचे जीवनदीप महाविद्यालयात प्रदर्शन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अनेकांना वेगवेगळया वस्तू संचयित करण्याचा छंद असतो. त्यामध्ये नाणी, दगड गोटे, तिकिटे इत्यादी गोष्टीचा संचय करताना लोक दिसून येतात परंतु उल्हासनगर मध्ये राहणारे सनी सुरेश काजळे हे मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांचे अनोखे चाहते निघाले आजवर आपण असं ऐकलं असेल! अशा अशा चहात्याने आपल्या आवडत्या क्रिकेटपटूचा टॅटू आपल्या शरीरावर गोंदवला. परंतु सनी काजले यांनी तब्बल ४३५३ कात्रणे संकलित करून त्याचा संग्रह केला आहे. सनी हे जीवनदीप महाविद्यालयात एम.



ए जनसंवाद व पत्रकारिता च्या द्वितीय वर्ष चे विद्यार्थी आहेत. जीवनदीप महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व पत्रकारिता विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक ८- १२- २०२५ रोजी महाविद्यालयाचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे ,संचालक. प्रशांत घोडविंदे ,प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य, हरेंद्र सोष्टे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर संग्रहाचे प्रदर्शन भरविण्यात आले ग्रंथपाल प्रा. राजाराम कापडी पत्रकारिता विभाग प्रमुख. प्रा. डॉ. राहुल तौर, व इतर प्राध्यापक हे प्रदर्शन पाहण्याकरता जीवनदीप महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपस्थित होते. महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग व पत्रकारिता विभाग यांच्या अंतर्गत हे प्रदर्शन भरविण्यात आले होते. विद्यार्थी, प्राध्यापक यांनी या प्रदर्शनाचा आस्वाद घेतला व सचिन तेंडुलकर यांचे अनेक दुर्मिळ फोटो कात्रणे पाण्याची त्यांना या प्रदर्शनामुळे संधी भेटली.

# बालविवाह निर्मूलनासाठी समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक

## अशा घटनांची चाईल्ड हेल्पलाईन क्रमांकावर माहिती द्यावी

### - जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** "बालविवाहाची प्रथा हद्दपार करायची असेल, तर समाजातील प्रत्येक घटकाने प्रशासनास सहकार्य करणे अत्यावश्यक आहे. अशा घटना दिसताच 1098 या चाईल्ड हेल्पलाईन क्रमांकावर माहिती द्यावी," असे आवाहन ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र सामाजीक विकास ट्रस्ट (MSVT/SEVA) यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत जिल्हास्तरावर जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या चित्ररथाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी ठाण्याचे न्यायमूर्ती रविंद्र पाजणकर, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नमिता शिंदे, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे श्री.रामकृष्ण रेड्डी, श्रीमती पल्लवी जाधव, संरक्षण अधिकारी श्रीमती रेखा हिरे यांच्यासह सखी केंद्र केंद्र, विशेष बाल विकास पोलिस अधिकारी, चाईल्ड लाईन ठाणे, MSVT/सेवा संस्थेचे संस्थापक श्री.अशोक पवार, श्री.रामेश्वर भाले, वैभव गायकवाड प्र. माहिती अधिकारी प्रवीण डोंगरदिवे, पोलीस प्रशासनातील अधिकारी तसेच पहिली ते चौथी इयत्तेतील विद्यार्थीनी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

चित्ररथ मोहिमेला हिरवा झेंडा दाखवत जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले, "बालविवाह रोखण्यासाठी समाजात व्यापक जनजागृती होणे गरजेचे आहे. परिसरात कुठेही बालविवाहासंबंधित संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ 1098 वर संपर्क साधून माहिती द्यावी. पुढील सर्व कार्यवाही प्रशासनाकडून करण्यात येईल."तसेच महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र सामाजीक विकास ट्रस्ट/सेवा आणि पोलीस प्रशासन यांनी समन्वयाने आणि दोन पावले पुढे जाऊन हा उपक्रम प्रभावीपणे राबवावा, असेही त्यांनी सांगितले. या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बालविवाह निर्मूलन मोहिमेला बळ द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी "सर्वांनी आता ठरवूया... बालविवाह हरवूया!" अशी घोषणा देत बालविवाहविरोधी लढ्यासाठी सामुहिक शपथ घेत दृढ संकल्प व्यक्त केला. तसेच स्वाक्षरी अभियानातील फलकावर स्वाक्षऱ्या करून बालविवाह मुक्त भारत अभियानातील सहभाग नोंदवला.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024